**पुणे महानगरपालिका**
**महिला व बाल कल्याण समिती**
**तहकुब सभा परिपत्र**

महिला व बाल कल्याण समितीची तहकुब झालेली सभा ( बुधवार,दिनांक ९/५/२०१८ रोजी तहकुब झालेली सभा ) बुधवार ,दिनांक २३/५/२०१८ रोजी दुपारी ३=२५ (तीन वाजून पंचवीस मिनिटे ) वाजता म. ज्योतीबा फुले सभागृहात (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

**सदर सभेत कार्यपत्रिका क्र.४ ,दि. ९/५/२०१८ वरील विषय क्र. १२ ते १८ चा विचार होईल**

**नगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**

**पुणे महानगरपालिका**
**महिला व बाल कल्याण समिती**
**कार्यपत्रिका क्र. ६**

महिला व बाल कल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार,दिनांक २३/५/२०१८ रोजी दुपारी ३=३० ( साडे तीन ) वा. म.ज्योतिबा फुले सभागृह (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**विषय क्र. २०**
**मा.सौ.अर्चना तुषार पाटील व मा.सौ.रुपाली धावडे यांचे यांचे दि.९.५.२०१८ चे पत्र.**

पुणे मनपा मार्फत शहरी गरीब योजने अंतर्गत वैद्यकीय सवलत देण्यात येते. त्यामध्ये सदर सेवेमध्ये दंत वैद्यकिय उपचाराकरिता पुणे मनपा मार्फत फक्त १०,०००/- इतका निधी एका रुग्णाला जीवनात फक्त एकदाच आदा करण्यात येतो. परंतु सध्याची वाढती महागाई पाहता पुणे मनपा मार्फत देण्यात येणारी दंत वैद्यकिय सेवेकरिता १०,०००/- ही रक्कम अपुरी पडणारी आहे.

तरी वैद्यकिय सेवा ही शहरी गरीब योजने अंतर्गत घ्यावी व दंत उपचार करीता रुग्णाचा जेवढा खर्च झाला आहे तेवढा निधी त्या रुग्णांस मिळावा व नियमानुसार वेळोवळी जेंव्हा जेंव्हा उपचार घेईन तेंव्हा तेंव्हा निधी देण्यात यावा.

**विषय क्र. २१**
**मा. अमोल बालवडकर व मा. बाबुराव चांदेरे ,मा.सौ. ज्योती गणेश कळमकर व मा.सौ. स्वप्नाली प्रल्हाद सायकर यांचे दि.१०२१.५.२०१८ चे पत्र.**

प्रभाग क्र. ०९ बाणेर सर्वे नं. १६४/१+२+४+५+६ अ येथील बांधण्यात आलेल्या आरोग्य केंद्र गेली अनेक महिन्यांपासून बांधून तयार आहे, तरी या भागात पुणे मनापाचा एकही दवाखाना आजपर्यंत अस्तित्वात नसून या आरोग्य केंद्राचा वापर हा या भागातील स्थानिक

डॉक्टरांच्या संघटनेला या भागातील गोर गरीब जनतेच्या वैद्यकीय उपचारासाठी व सेवेसाठी उपलब्ध करुन द्यावा, ही विनंती.

तरी या आरोग्य केंद्रामार्फत नागरिकांना खालील वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्यात येतील.

१. बी.एम.ए.(बाणेर–बालेवाडी मेडिको असोसिएशन ) तर्फे मोफत ओ.पी.डी. सेवा सर्व तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत देण्यात येईल.
२. बाणेर मेडिकल सर्विसेसच्या मार्फत अतिशय आधुनिक डायग्नॉस्टिक सेंटर उभारण्यात येईल व त्यामार्फत म.न.पा.च्या गरजू रुग्णांना म.न.पा.च्या दरानुसार सेवा देण्यात येईल.
३. रुग्णांसाठी जेनेरिक औषधालय सुरु करण्यात येईल.

**विषय क्र. २२**

**मा. सौ.सोनाली लांडगे व मा.सौ.सुनिता वाडेकर ,गटनेत्या आर.पी.आय. यांचे दि.१७.५.२०१८**

प्रभाग क्र. ७ अ वाकडेवाडी – पुणे विद्यापीठ , मधील संगमवाडी येथील राणे शाळेच्या मागे असणारे जुने शौचालय पाडून त्याठिकाणी नवीन शौचालय बांधण्यात यावे .

**विषय क्र. २३**

**मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे ,उपमहापौर व मा.हिमालीताई कांबळे यांचे दि.१८.५.२०१८ चे पत्र.**

पुणे शहर हे विद्येचे माहेरघर आहे. पुणे शहराचे नावलौकीक शिक्षणामुळे संपूर्ण जगामध्ये प्रसिध्द आहे. पुणे शहराचे संपूर्ण जगामध्ये शिक्षण क्षेत्रामध्ये झपाट्याने परिवर्तन होत आहे. या परिवर्तनाची चाहूल पुणे शहरामधून होत असते. पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातून शिक्षण विभागामार्फत नागरीकांच्या शिक्षण पध्दतीमध्ये त्यांच्या मुलांना शिक्षण देण्याचा कल इंग्रजी माध्यमाकडे वाढताना दिसत आहे.

त्यामुळे पुणे महानगरपालिकेच्या वतीने इंग्रजी माध्यमाचे प्राथमिक वर्ग चालू करणेत आले . हे विद्यार्थी इ.७ वी नंतर खाजगी शाळेमध्ये प्रवेश घेणेकरीता गेल्यास त्यांना प्रवेश दिला जात नाही. त्यामुळे ते विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहतात . याकरीता पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाने पुणे महानगरपालिकेच्या वतीने इंग्रजी माध्यमाचे माध्यमिक च्या शाळा झोन निहाय व त्या इ.१० वी पर्यंत नैसर्गिक वाढीप्रमाणे सुरु करावेत .

**विषय क्र. २४**

श्रीमती रोहीणी प्रल्हादराव फुले,सह.शिक्षिका यांना माध्यमिक तांत्रिक शिक्षण कार्यालयाकडे माध्यमिक शिक्षक या पदावर बदलीने नियुक्ती करुन घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचेकडील जा.क्र.मआ /साप्र/ ६९, दिनांक १७/५/२०१८ चे सुधारीत विषयपत्र.

नगरसचिव
पुणे महानगरपालिका